| | | |
|---|---|---|
| | पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण<br>पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003<br>दुरध्वनी नंबर 0253-2309700<br>E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in | |

## प्रेस नोट

दिनांक : १२/१२/२०२४

### १९ वा, महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा-२०२४
### नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलास सी.सी.टी.एन.एस. विभागास व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक

---

१९ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा-२०२४ हा दि. ०९/१२/२०२४ ते दि. १२/१२/२०२४ या कालावधीमध्ये महाराष्ट्र राज्य प्रबोधिनी, रामटेकडी, पुणे व राज्य राखीव पोलीस बलगट १ व २ रामटेकडी, पुणे या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता.

गुन्हे व गुन्हेगार शोध व जोडणी प्रणाली Crime and Criminal Tracking Network and System (C.C.T.N.S) या कार्यप्रणालीमध्ये नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलास सन २०२४ वार्षिक गुणांकनामध्ये महाराष्ट्र राज्यात व्दितीय क्रमांकाचे पारितोषीकावर आपले नाव कोरले.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री.विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक, श्री. आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक, श्री.अनिकेत भारती, सर्व विभागीय पोलीस अधिकारी यांचे सह नाशिक ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे यांनी पोलीस ठाण्यात दाखल होणारे गुन्हे, अहवाल यांची सी.सी.टी.एन.एस. मधील नोंदणी, सी.सी.टी.एन.एस. प्रणालीचा वापर करून पोलीस ठाण्यास अटक होणाऱ्या आरोपीतांची कुंडली जुळवून गुन्हे उघडकीस आणण्यात प्रभावी कार्यवाही केली आहे.

आज दि. १२/१२/२०२४ रोजी पुणे येथे संपन्न झालेल्या दिमाखदार बक्षीस वितरण समारंभात मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य श्रीमती रश्मी शुक्ला मॅडम यांनी पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण श्री.विक्रम देशमाने यांचे सह नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या गुन्हे व गुन्हेगार शोध व जोडणी प्रणाली Crime and Criminal Tracking Network and System (C.C.T.N.S) विभागातील कार्यरत अंमलदार महिला पो.हवा/१४५६ सिमा उगलमुगले, महिला पो.हवा/१८१४ ज्योती अहिरे व महिला पो.हवा/८२० प्रतिभा शिंदे यांचा महाराष्ट्र राज्यात सी.सी.टी.एन.एस. विभागात उत्कृष्ठ कामगिरी केल्याबद्दल नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलास सन २०२४ या वषाचे व्दितीय क्रमांक विजेता सन्मानचिन्ह व बक्षिसपत्र देवुन गौरव केला आहे.